# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 July 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १५ जूलै २०२५ दुपारी १.०० वा.**

****

मोठ्या परताव्याचं आमीष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्यांच्या विरोधातल्या शिक्षेचा कालावधी आणि दंडाची रक्कम वाढवण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिली. सदस्य अमोल खताळ यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर ते बोलत होते. अशा गुन्ह्यातल्या आरोपी कंपनीची मालमत्ता शोधणं, त्या मालमत्तेचं मूल्यांकन करणं आणि खटल्याचा जलद निपटारा करण्यासाठी पोलिसांना मदत करणं, यासाठी राज्य सरकार विशेष व्यवस्था निर्माण करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

राज्याला बेघरमुक्त करण्याच्या दिशेनं प्रयत्न सुरू असून, राज्यातली प्रधानमंत्री आवास योजनेची प्रतीक्षा यादी संपली असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी आज सदनात दिली. यावर्षी केंद्र सरकारने सर्वाधिक ३० लाख घरे महाराष्ट्राला मंजूर केली असून, त्यातल्या २० लाख घरांना निधी दिल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यभरातल्या बेघरांचं सर्वेक्षण महिनाभरात ते पूर्ण होण्याची शक्यता आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना सौर प्रकल्प राबवण्यासाठी राज्य सरकार ५० हजार रुपये आर्थिक मदत देत आहे, यामुळे त्यांचं वीज बिल शून्यावर यायला मदत होईल, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

****

राज्य सरकारचा मद्य परवाने देण्याचा निर्णय लाडक्या बहिणींचे संसार उध्वस्त करेल, असा आरोप करत, महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज विधानभवनाच्या पायऱ्यांवर घोषणा देत आंदोलन केलं. मद्य परवाने दिल्यानं राज्यातलं जनजीवन विस्कळीत होईल, असा दावा विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी यावेळी केला.

****

मुंबईत आज टेस्ला कंपनीच्या पहिल्या शो रूमचं उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झालं. यावेळी त्यांनी महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन क्षेत्रात अग्रणी ठरत असल्याचं सांगितलं. टेस्लानं भारतात मुंबईची निवड केल्याचा त्यांनी आनंद व्यक्त केला. राज्य सरकार इलेक्ट्रीक गाड्यांसाठी धोरणात्मक प्रोत्साहन देत असून, भविष्यातील ग्रीन मोबिलिटीचा केंद्रबिंदू महाराष्ट्र ठरणार असल्याचं फडणवीस यांनी स्पष्ट केलं.

****

ॲक्सिओम फोर मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर गेलेले भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि त्यांचे सहकारी आज भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी तीन वाजता पृथ्वीवर परतणार आहेत. या मोहिमेत शुक्ला यांनी १४ दिवस आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात मुक्काम केला. परत आल्यानंतर हे अंतराळवीर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी विलगीकरणात राहतील.

****

भारतानं ऊर्जानिर्मितीच्या क्षेत्रात नवीन टप्पा पूर्ण केला आहे. जीवाश्मेतर इंधनातून वीजनिर्मितीचं ५० टक्के उद्दीष्ट निर्धारित मुदतीच्या पाच वर्ष आधीच पूर्ण झालं आहे. भारताची एकूण वीजनिर्मिती क्षमता ४८४ गिगावॅट असून, त्यापैकी २४२ गिगावॅट वीजनिर्मिती सध्या जीवाश्मेतर इंधनाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जेच्याबाबत भारतानं दाखवलेली कटिबद्धता वास्तवात येत असल्याचं स्पष्ट झालं आहे. नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी याबाबत समाजमाध्यमावर संदेश प्रसारित करुन भारतासाठी ही घटना ऐतिहासिक असल्याचं म्हटलं आहे.

****

नांदेड इथले ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत नरहर कुरुंदकर यांच्या जयंतीनिमित्त आज खासदार रविंद्र चव्हाण यांनी कुरुंदकर यांच्या स्मारकास अभिवादन केलं. यावेळी माजी महापौर जयश्री पावडे यांच्यासह नागरीक उपस्थित होते.

****

नाशिक जिल्ह्यात समृद्धी महामार्गावरून दोन कारमधून केली जाणारी गांजाची तस्करी उधळून लावण्यास ग्रामीण पोलिस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेला यश आलं. सुमारे दीड-दोन तास पोलिसांची चार पथकं या दोन्ही कारचा पाठलाग करत

होती. यावेळी दोघे पोलिस खाली पडून जखमी झाले. पोलिसांनी दोन्ही कारसह १२२ किलो गांजा जप्त केला करुन, तीन संशयितांना अटक केली.

****

धाराशिव जिल्ह्यात येत्या १९ तारखेला मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. जिल्ह्यात वृक्षांचं प्रमाण वाढावं, जिल्हा वृक्षांनी आच्छादित व्हावा आणि त्या माध्यमातून पर्यावरणाचा समतोल राखता यावा यासाठी ही मोहिम राबवण्यात येणार आहे. जिल्ह्यातल्या २९४ ठिकाणच्या पाच हजार ७०२ आर क्षेत्रावर १५ लाख विविध देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. नागरीकांनी या मोहिमेत उस्फुर्त सहभाग नोंदवून वृक्ष लागवड हा सृष्टीचा सोहळा साजरा करावा, असं आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं काल लोकशाही दिनात नव्याने दाखल आठ तर पूर्वीच्या बारा अशा एकूण २० प्रकरणांवर सुनावणी झाली. प्रलंबित प्रकरणापैकी आठ प्रकरणं यावेळी निकाली काढण्यात आली.

****